# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक १२/०६/२०१८

## लोकसहभागातुन गडचिरोली पोलीसांनी केली पुलाची दुरुस्ती

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणा-या पोमके कोटमी हद्दीतील कसनसुर ते रेगडी गावाकडे जाणा-या मुख्य रस्त्यावरील एटावाही पुल हा यावर्षीच्या झालेल्या पहील्या जोरदार पावसाने वाहुन गेला होता. यामुळे चामोर्शी - घोट - कसनसुर मार्गावरुन छत्तीसगड ला जाणारी वाहतुक पुर्णपणे बंद झाली होती. यामुळे या परिसरातील १५ ते २० गावातील नागरिकांना आरोग्य, शिक्षण व इतर सोयीसुविधांसाठी ये - जा करणे कठीण झाले होते.

पोमके कोटमी चे प्रभारी अधिकारी भरत नागरे, पोउपनि गिरीधर पेंदोर, पोउपनि प्रशांत भागवत, पोउपनि प्रदिप ठुबे यांनी पुढाकार घेवुन एटावाही, कोटमी व कोंडावाही गावातील लोकांना सोबत घेवुन लोकसहभागातुन श्रमदानाने या वाहुन गेलेल्या पुलाचे बांधकाम हाती घेतले. पोलीसांनी एटावाही पुलावर लोकसहभागातुन सिमेंट कॉंक्रेट व मातीचा भराव टाकला. त्यामुळे पुलाचे काम अवघ्या दोन दिवसात पुर्ण होवुन एटावाही पुल लोकांच्या वापरासाठी सुरळीत तयार झाला. पुलामुळे या भागातील १५ ते २० गावांना फायदा झाला असुन त्यामुळे त्यांचा येण्याजाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असुन पोलीसांनी नागरीकांसाठी राबविलेल्या या चांगल्या उपक्रमामुळे नागरिकांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.